महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

विक्रोळी, मुंबई परिसरात मुस्लीम समाजासाठी कब्रस्थान नसल्याबाबत

(१) ८३४८ (०२-०४-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी, मुंबई परिसरात मुस्लीम समाजासाठी कब्रस्थान नसल्यामुळे रहिवाशांची गैरसोय होत असून विक्रोळी येथील न.भू.क्र. ६५७ पार्ट या जमिनीमध्ये १७.३९९ क्षेत्रफळ इतकी जागा कब्रस्थानसाठी आरक्षीत असुनही जमीन भाडेपट्टयाने दिली होती, परंतू विकासकाने विहित अटीचा भंग केल्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या आदेशाने जमीन पुन्हा शासनाच्या नावे दाखल केली आहे. सदर कब्रस्थानसाठी आरक्षीत असलेली जमीन मुस्लीम समाजाला कब्रस्थानसाठी देण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मुस्लीम समाजाची होणारी गैरसोय दुर करण्यासाठी सदरची जागा कब्रस्थानसाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१७) : (१) व (२) मौजे विक्रोळी, ता.कुर्ला येथील स.नं. २७५ पै.न.भू.क्र. ६५७ (पै.) मधील जमीन कब्रस्थानासाठी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दि.०३/०६/२०१५ रोजी मागणी प्राप्त झालेली आहे.

स.नं. २७५ पै. न.भू.क्र. ६५७ पै मधील १६१९ एकर ३१ गुंठे जमीन आहे. त्यापैकी सॉल्ट डिपार्टमेंट, द्रुतगती महामार्ग व आँध्रव्हॅली सॉल्ट डिपार्टमेंट, द्रुतगती महामार्ग व आँध्रव्हॅली पॉवर ट्रान्समिशन लाईन या खालील जमीन वगळता उरलेल्या जमिनीपैकी २०० एकर १५ गुंठे ४ आणे जमिनीबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.५७९२/१९९६ दाखल करण्यात आली आहे. सदर रिट याचिकेमध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.१४/१/१९९७ अन्वये स्थगिती आदेश पारित केलेले आहेत.

मुस्लीम समाजाच्या कब्रस्थानासाठी आरक्षित असलेली जमीन या प्रयोजनसाठी प्रदान करण्याकरीता सदर स्थगिती उठविण्याच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन नं.१७३८/२०१२ दाखल केले होते. तथापि, मा.मुंबई उच्च न्यायालयाने सदर सिव्हील ॲप्लिकेशन दि.०७/०९/२०१२ रोजी रद्द केले आहे. यास्तव सदर जमिनीवरील स्थगिती अद्याप कायम आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर आणि आटपाडी (जि.सांगली) तालुक्यामध्ये प्रमुख जिल्हा मार्ग व इतर जिल्हा मार्गांची, त्यावरिल पुलांची व मोऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(२) १५२६२ (१०-०४-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील खानापूर आणि आटपाडी तालुक्यामध्ये प्रमुख जिल्हा मार्ग व इतर जिल्हा मार्गावर जागोजागी पडलेल्या खडयामुळे तसेच मार्गावरील महत्त्वाचे पूल व मोऱ्या यांची गेल्या कित्येक वर्षात देखभाल, दुरूस्ती न झाल्यामुळे परिसरातील वाहतुकीला मोठया समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे सन २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच सदरचे रस्ते, पूल व मोऱ्या यांची देखभाल व दुरूस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

(२) सांगली जिल्हयातील आटपाडी व खानापूर तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग हे जिल्हा परिषद, सांगली कडून सा.बां.खात्याकडे मे-२०१३ मध्ये वर्ग झाले असून प्रमुख जिल्हा मार्गावरील खड्डे भरण्यात आलेले आहेत. सन २०१४ मध्ये विविध योजनेतून काही नवीन मोऱ्यांची बांधकामे करण्यात आलेली आहेत. रस्त्यांची तसेच पूल व मोऱ्यांची दुरुस्ती निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील सर्व्हे नं. ३६ व ११७ मधील बारा घरांच्या बांधकामाचे सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत

(३) १५६३० (०९-०४-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नांदोली (ता. शिराळा, जि.सांगली) येथील सर्व्हे नं. ३६ व ११७ मधील बारा घरांच्या बांधकामाचे सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत संबंधित १२ व्यक्तींनी जिल्हाधिकारी, सांगली याच्याकडे सन २०१३ मध्ये निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ५, सांगली यांनी दिनाक १० जुलै, २००२ रोजी नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता व तो अद्यापही शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित १२ कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने संबंधित प्रस्ताव शासनाकडे दिर्घकाळ प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत,
(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाचे धोरण काय आहे व संबंधित कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०४-२०१७) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) विभागीय आयुक्त, पुणे यांनी विभागास १.११.८० रोजी सादर केलेल्या प्रस्तावावर वित्त विभागाचे अभिप्राय अपेक्षिलेले असता वित्त विभागाने प्रकरणी आक्षेप नोंदविले होते.

सदर आक्षेपांची पुर्तता करून विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि. १८.१२.१९८६ रोजीच्या पत्रान्वये शासनास सुधारीत प्रस्ताव सादर केल्याचे कळविले आहे. तथापी, सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्याचे अभिलेखी दिसून न आल्यामुळे विभागीय आुक्तांकडून पुनश्च: प्रस्ताव मागविण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाने दि. १०.०२.२०१६ रोजी सुधारीत प्रस्ताव सादर केला.

तसेच, मौजे नांदोली, ता. शिराळा, जि. सांगली येथील १२ घरे कलम ४ ची अधिसुचना प्रसिध्द होण्यापूर्वी अस्तित्वात असल्याबद्दल संपादक संस्था, कार्यकारी अभियंता, वारणा कालवे विभाग, क्र.१ यांचे प्रमाणपत्र सादर केले आहे. तद्नंतर विभागाने जलसंपदा विभागाच्या अभिप्रायासाठी सदर प्रस्ताव सादर केला आहे. जलसंपदा विभागाचे अभिप्राय प्राप्त करून त्यास वित्त विभाग व शासन मान्यतेने तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

सातारा जिल्ह्यातील कराड शहराला जोडणाऱ्या वांरूजी फाटा ते विजयनगर, कराड ते कार्वे, सैदापूर ते बनवडी फाटा या रस्त्यांच्या चौपदरीकरणाबाबत

(४) १८३०७ (३०-०७-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील कराड शहराला जोडणाऱ्या वांरूजी फाटा ते विजयनगर, कराड ते कार्वे, सैदापूर ते बनवडी फाटा या रस्त्यांच्या चौपदरीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम संथगतीने सुरू आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काम संतगतीने सुरु असल्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१७) : (१) सातारा जिल्हयातील कराड शहराला जोडणाऱ्या
अ) वारुंजी फाटा ते विजयनगर ४.५ कि.मी. रस्त्यापैकी १ कि.मी.लांबीतील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे बहुतांशी काम पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
ब) कराड ते कार्वे-४ कि.मी. क) कृष्णा पूल ते ओगलेवाडी ४.२ कि.मी. ड) बनवडी फाटा ते कृष्णा कॅनॉल - १.५ कि.मी. या रस्त्याच्या चौपदरीकरणाची बहुतांश कामे सद्यस्थितीत प्रगतीपथावर असून सदरील कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) हे खरे नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) निधी व निकषांच्या अधीन राहून सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बांबवडे ते सरुड (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) ते सांगाव (ता.शिराळा, जि.सांगली) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

(५) २१८२१ (०३-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) बांबवडे ते सरुड (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) ते सांगाव (ता.शिराळा, जि.सांगली) हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. २०४ आणि राज्यमार्ग क्र १५० यांना जोडणारा आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतुक होत असल्यामुळे सदरचा रस्ता वारंवार खराब होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याला राज्यमार्गाचा दर्जा देणेविषयी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर रस्ता अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे काही प्रमाणात खराब होतो. परंतू सद्यस्थितीत प्रश्नाधिन रस्त्याच्या एकुण ७.१५० कि.मी. लांबीपैकी बांबवडे ते सरुड हा ४.०० कि.मी. लांबीतील रस्ता सरुड ते सांगाव या रस्त्यापैकी सरुड ते सांगली जिल्हा हद्दिपर्यंतचा २.०० किमी. लांबीतील रस्ता व सांगाव ते कोल्हापूर जिल्हा हद्दीपर्यंतचा १.१५० कि.मी.

लांबीतील रस्त्यापैकी सांगांव बाजूकडील ०.४ कि.मी. लांबीतील रस्ता असा एकूण ६.४०० कि.मी. लांबीतील रस्ता सुस्थितीत असून उर्वरित ०.७५० किमी लांबीतील काम मंजूर असून निधी उपलब्धतेनुसार पुणे करण्याचे नियोजन आहे.

प्रश्नाकिंत रस्ता हा रा.म.क्र२०४ व रा.मा.क्र.१५० यांना जोडणारा असून, प्रजिमा दर्जाचा आहे, या मार्गावरील वाढती वर्दळ लक्षात घेऊन सदर ७.१५० कि.मी. चा मार्ग राज्यमार्गात दर्जोन्नत करण्याचे सद्यस्थितीत प्रस्तावाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याबाबत

(६) २१९७९ (११-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंगल्याच्या छतावर, शेतजमिनीत किंवा स्वत:च्या मालकीच्या जागेत नामवंत कंपनीचा मोबाईल टॉवर उभारा आणि कोट्यवधी रुपये मिळवा अशा जाहिरातीच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचा गंडा घातल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याही गुंतवणुकीशिवाय महिन्याला ५० ते ६० हजार रुपये भाडे मिळत असल्याने शेतकरी किंवा अपार्टमेंटचा मालक आपली जमीन, बंगला, घराच्या छतावर असे टॉवर उभारण्यास परवानगी देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपन्यांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबंधित कंपन्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१७) : (१) मोबाईल टॉवर उभारणीसाठी जमीन मालक व मोबाईल कंपनी (सेवा पुरवठादार) यांच्यामध्ये सहमतीने करारनामा होऊन शेतजमीन अथवा बंगल्याच्या छतावर, स्वत:च्या मालकीच्या जागेत मोबाईल टॉवर उभारण्यास संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांकडून परवानगी देण्यात येते, तथापि, प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे जाहिरातीच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचा गंडा घातल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) मोबाईल टॉवर उभारणीसाठी जमीन मालक व मोबाईल कंपनी (सेवा पुरवठादार) यांच्यामध्ये परस्पर सहमतीने टॉवर उभारण्याबाबत करार करण्यात येत असल्याने त्यापोटी किती रक्कम जमीन मालकास देण्यात येते हे दोन्ही पक्षांकडून पारस्पारिक सहमतीने त्यांच्या स्तरावर ठरविण्यात येते.

(३) क्षेत्रिय पहाणीत आढळून आलेल्या अनधिकृत टॉवर उभारणीबाबत अनधिकृत अकृषिक वापरासाठी दंडाचे आदेश पारीत करुन अकृषिक आकारणीच्या वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वीट उत्पादक शेतकरी व मंजूरांनी प्रात कार्यालय भिवंडी (ठाणे) येथे काढलेला मोर्चा

(७) २८२८३ (२९-०९-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिसेंबर, २०१४ व मार्च एप्रिल, २०१५ या महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे वीट उत्पादक व मुजरांचे नुकसान झाल्यामुळे नुकसानग्रस्त वीट उत्पादक शेतकरी व मजूर यांनी आपल्या मागण्यासाठी दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी प्रांत कार्यालय भिवंडी (जि.ठाणे) येथे मोर्चा काढून रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीट उत्पादक व मजूर यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, भिवंडी प्रांत कार्यालयाने मागील वर्षीच्या हंगामात भिवंडीतील वीट उत्पादक शेतकऱ्यांना स्वामीत्व धनाच्या नोटीसा देऊन, शेत जमिनीच्या उताऱ्यावर बोजा चढविण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या वीट उत्पादक शेतकरी व मजूर यांच्या मागण्याचे संदर्भात तसेच स्वामित्व धनाच्या बोजा शेतकऱ्यांच्या उताऱ्यावरुण कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१७) : (१) होय.

(२) i. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक सहाय्य करावे.

ii. बाजारात सेफोरेक्स वीटा आल्याने व रेतीवर बंदी असल्याने वीट उत्पादनावर परिणाम होऊन रोजगार बुडत असणे,

iii. वीट उत्पादकांना दिलेल्या दंडाच्या नोटीसा मागे घेणे, वीटभट्टीवरील मजूरांना कामाच्या विभागात रेशनिंगचे धान्य मिळावे, व

iv. सेफोरेक्स वीटा बनवणाऱ्या बड्या भांडवलदार कंपन्या बंद करणे.

अशा स्वरूपाच्या मागण्या केल्या आहेत.

(३) व (४) ज्या वीटभट्टी उत्पादक शेतकऱ्यांनी गौण खनिजाचे अनधिकृतरित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आले, अशा वीट उत्पादकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८(७) मधील तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचेमार्फत नोटीसा देण्यात आल्या. संबंधित वीटभट्टी धारकांकडून विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्याने दंडाचे आदेश पारित करण्यात आले आहेत. तसेच सदर दंडाची रक्कम विहित मुदतीत भरणा न केल्यास, सदर रक्कम महाराष्ट्र जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सदर दंडनिय रकमेचा बोजा कमी करणेसाठी कोणत्याही संबंधित शेतकऱ्याने वरीष्ठ कार्यालयात/न्यायालयात अपिल दाखल केलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयात जमिनीच्या मालकी हक्कातील बदल (ऑनलाईन सातबारे) संगणकावर भरण्यास सुरुवात केल्याबाबत

(८) ३२९२१ (२३-१२-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात जमिनीच्या मालकी हक्कातील बदल ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने जमाबंदी व भूमिअभिलेख विभागाने सन २००३ पासून सर्व सातबारे उतारे संगणकावर भरण्यास सुरवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३० जानेवारी, २०१५ पासून हस्तलिखित नोंदी बंद करण्याचा निर्णय जाहिर करून राज्यात एकाचवेळी अनेक ठिकाणी ई फेरफार योजना सुरू केल्याची घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई फेरफार योजनेत पुरेशी पूर्वतयारी न झाल्याने अनेक तलाठी कार्यालयातील नोंदीचे काम ठप्प झाल्याने नव्या प्रणालीतील त्रुटी प्रकर्षाने पुढे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास ई-फेरफार संगणक प्रणाली सुरळीत होण्याकरिता अजून किती कालावधील लागणार आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०५-२०१७) : (१), (२), (३) व (४) राज्यात अधिकार अभिलेख गा.न.नं.७/१२ उतारे संगणकीकृत करण्याची कार्यवाही २००३ पासून सुरु करण्यात आली आहे.

अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणकीकरण करुन "ई-फेरफार" प्रणालीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा निर्णय शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला आहे.

दि. ३० जानेवारी, २०१५ पासून हस्तलिखित नोंदी बंद करण्याची बाब वस्तुस्थितीस धरुन नसून ज्या-ज्या तालुक्यांतील गा.न.नं.७/१२ चा संगणकीकृत डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आला त्या-त्या तालुक्यांमध्ये अधिकार अभिलेख ऑनलाईन पध्दतीनेच अद्ययावत होणे अपेक्षित असल्याने हस्तलिखित नोंदी घेण्याची कार्यपध्दती बंद करण्यात आली असून अखेर राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी, चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुका वगळता उर्वरीत सर्व ३५७ तालुक्यांतील गा.न.नं.७/१२ चा संगणकीकृत डाटा "स्टेट डाटा सेंटर" वर अपलोड करण्यात आला आहे.

ई-फेरफार कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत गा.न.नं.७/१२ चा डाटा तयार करणे, तो स्टेट डाटा सेंटर (SDC) वर अपलोड करणे, ई-फेरफार आज्ञावलीच्या माध्यमातून फेरफार नोंदी घेणे तसेच संगणकीकृत गा.न.नं.७/१२ वितरीत करणे या प्रक्रियेत असणाऱ्या डाटा एन्ट्री

विषयक, सर्व्हरविषयक, कनेक्टीव्हीटी विषयक व आज्ञावलीविषयक समस्या काही ठिकाणी उदभवल्या होत्या. याबाबत "ई-फेरफार" आज्ञावलीविषयक अडचणी विचारात घेवून राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राकडून "ई-फेरफार" आज्ञावली व्हर्जन-२ विकसित करुन ती क्षेत्रिय यंत्रणेस वापरास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भातील अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी उपविभागीय तसेच जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना "ई-फेरफार" प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच सर्व संबंधित कर्मचाऱ्यांकडे आवश्यक ते हार्डवेअर (लॅपटॉप / प्रिंटर्स) उपलब्ध असून जेथे संबंधितांकडे ते उपलब्ध नाहीत अथवा पुरविण्यात आलेले हार्डवेअर कालबाह्य झाले आहे अशा प्रकरणी ते संबंधितांना पुरविण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावरुन सुरु आहे. संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्रीच्या व डाटा कन्व्हर्जनच्या काही ठिकाणी आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याकरीता तलाठ्यांना "एडीट मोड्युल" ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याच्या वापराबाबत सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना एडिट मॉड्यूलचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

तसेच संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ वितरीत करण्यात काही ठिकाणी अद्यापही येत असलेल्या अडचणी विचारात घेता, "एडीट मोड्यूल" च्या माध्यमातून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या होईपर्यंत तसेच, जेथे तांत्रिक कारणांस्तव "ई-फेरफार" प्रणालीतून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ च्या उताऱ्यांचे प्रिंट आऊट काढून अर्जदारांस वितरीत करणे शक्य होत नसेल तेथे, आता एक विशेष बाब म्हणून, केवळ शेतकरी खातेदारांना कर्ज व अन्य शेती विषयक प्रयोजनाकरीता हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यास दि.२८/०२/२०१७ पर्यंत मुभा देण्यात आली होती. ही मुदत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत अशा भागात मंडळ स्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह "ई-फेरफार कार्यकक्ष" स्थापन करण्यात आले आहेत. ज्या मंडळस्तरावर इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही तेथे सॅटेलाईटव्दारे कनेक्टीव्हीटी पुरविण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहेत.

"ई-फेरफार" प्रणाली राबविण्यासंदर्भातील सर्व अडचणींवर मात करुन तिच्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासन प्रयत्नशील आहे.

मुंबई उपनगर मालाड पश्चिम लिंक रोड येथील मे. एव्होरा विकासकास गणपत ताबली या आदीवासीने बेकायदा हस्तांतरीत केलेला भूखंड शासन जमा करण्याबाबत

(९) ३३६४७ (२३-१२-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर मालाड पश्चिम लिंक रोड येथील मे. एव्होरा विकासकास गणपत ताबली या आदीवासीने बेकायदा हस्तांतरीत केलेला भूखंड शासन जमा करण्याचे आदेश मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बेकायदा हस्तांतरित केलेला आदिवासीचा भूखंड शासन जमा करण्यास शासनास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा. मुख्य सचिव, यांना दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त भूखंड सरकार जमा करणेबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१७) : (१) होय.
(२) सदरचा भूखंड दिनांक २१/११/२०१५ रोजी फेरफार क्र. २२३० अन्वये सरकारजमा करण्यात आलेला आहे.
(३) होय.
(४) सदरचा भूखंड दिनांक २१/११/२०१५ रोजी फेरफार क्र. २२३० अन्वये सरकार जमा करण्यात आलेला आहे. परंतु विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील दि. ०६/०४/२०१६ रोजीचे स्थगिती आदेश असल्याने सदर भूखंडाचा ताबा घेण्यात आलेला नाही. अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेसमोर त्यानुषंगाने सुनावणी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्यावरुन जाणाऱ्या वाहनांची संख्या कमी दाखवून जमा होणाऱ्या टोलची रक्कम कमी दाखविल्याबाबत

(१०) ३५२५२ (२३-१२-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्यावरुन जाणाऱ्या वाहनांची संख्या कमी दाखवून जमा होणाऱ्या टोलच्या रक्कमेच्या निम्म्यापेक्षा कमी टोल जमा झाल्याचे दाखविले जाऊन या नाक्यांवर किती रक्कम जमा झाली, याची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेगवेगळी माहिती दिली जात असल्याचे संजय शिरोडकर यांनी माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीच्या आधारे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये स्पष्ट केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०७-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

पुणे सातारा राष्ट्रीय महामार्ग ४ हा राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आहे. सदर लांबीपैकी सातारा-कोल्हापूर-कागल ही राष्ट्रीय महामार्ग ४ ची लांबीचे

उदयोजक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ असुन सदर लांबीतील पथकर वसुली संबंधीत माहिती Electronic Display Board व MSRDC च्या वेबसाईटवर देण्यात येत असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले आहे.

तसेच पुणे सातारा हि लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित असुन सदर प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातुन प्रगतीत असल्याचे व त्यास उदयोजकाची निविदा अधिमूल्याची (On Premium) असुन दरसाल ५% वाढीप्रमाणे रक्कम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे जमा करण्यात येत असल्याने कमीची वाहतुक वर्दळ दर्शविण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई, पनवेल, जेएनपीटी आणि पेण इत्यादी महत्वाच्या ठिकाणांना जोडणाऱ्या गव्हाण फाटा रस्त्यावर उड्डाणपूल बांधण्याबाबत

(११) ४०३५१ (२९-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, पनवेल, जेएनपीटी आणि पेण इत्यादी महत्वाच्या ठिकाणांना जोडणाऱ्या गव्हाण फाटा रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने या ठिकाण उड्डाणपूल बांधण्याची मागणी तेथील नागरिक वारंवार संबधित अधिकाऱ्यांकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०७-०६-२०१७) : (१) व (२) जे.एन.पी.टी.बंदर जोड रस्त्याच्या ६/८ पदरीकरणाच्या रुंदीकरणाच्या प्रकल्पामध्ये गव्हाण फाटा येथे इंटरचेंज (Interchange) बांधण्याची तरतूद असून सदरचे काम प्रगति पथावर असल्याचे मुंबई जेएनपीटी पोर्ट रोड कंपनी लिमीटेड (भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण संयुक्त उपक्रम) यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाचोरा (जि.जळगांव) तालुक्यातील गिरणा नदीवर भडगांव शहर ते जूना वाक रस्ता या ठिकाणी पूलाचे बांधकाम करण्याबाबत

(१२) ४७२३० (२९-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) तालुक्यातील गिरणा नदीवर भडगांव शहर ते जूना वाक रस्ता या ठिकाणी पूलाचे बांधकाम झाल्यास नागरिकांच्या वेळेची व इंधनाची बचत होणार असून यासंदर्भात नागरिक वारंवार मागणी करीत असल्याने या ठिकाणी पूलाचे बांधकाम होण्याकरिता मा.जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-०४-२०१७) : (१) होय
(२) व (३) भडगाव शहर ते जुना वाक रस्ता हा ग्रामीण मार्ग-८७ या जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदरचा रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, जळगाव यांचे अखत्यारीत आहे. मागणीकृत पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

अमरावती जिल्ह्यात गत चार ते पाच वर्षापासून निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाच्या महसूली उत्पन्नात घट झाल्याबाबत

(१३) ४८०२८ (२०-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात गत चार ते पाच वर्षापासून निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाच्या महसूली उत्पन्नात लक्षणीय घट झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात गौण खनिज व मनोरंजन कराची टक्केवारी घसरल्याने विकास कामांवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील अंतिम पैसेवारी कमी असल्याने दुष्काळाबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला असून शासनाकडून अद्याप दुष्काळ घोषित करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अमरावती जिल्ह्यास दुष्काळग्रस्त घोषित करुन या जिल्ह्यात महसुलीत वाढ होण्याबाबत प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास विलबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१७) : (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.२३.३.२०१६ अन्वये २०१५-१६ च्या खरीप हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करून अमरावती जिल्ह्यातील १९६७ गावांमध्ये अशा विविध उपाययोजना लागू केलेल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील बोरिवली पूर्व रेल्वे स्थानकापासून नॅशनलपार्क हायवेपर्यंत स्काय वॉक बांधण्याबाबत

(१४) ५००५३ (१७-०५-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरिवली पूर्व रेल्वे स्थानकापासून नॅशनलपार्क हायवेपर्यंत वाहतूकीची कोंडी होत असून पादचाऱ्यांनाही त्रास होत असल्याने या ठिकाणी स्काय वॉक बांधण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी स्कायवॉक बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०५-२०१७) : (१) हे खरे नाही. परंतु स्थानिक लोकप्रतिनिधींनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळील ओंकारेश्वर मंदीर येथे पश्चिम द्रुतगती महामार्ग ओलांडण्याकरीता पादचारी पुलाची मागणी केलेली आहे.

(२) प्रस्तावित जागा ही महामार्गाच्या हद्दीत येत असून, आजूबाजूस नॅशनल पार्क ट्रॅफिक चौकी व वाहतूक बेट असून वाहतूक जंक्शन आहे. तसेच पूर्व / पश्चिम बाजूला नॅशनल पार्क उड्डाणपूल जात असल्याने पादचारी पूल बांधणे शक्य नाही, त्याचप्रमाणे प्रस्तावित जागेमध्ये नॅशनल पार्क उड्डाणपूलाचे फाऊंडेशन येत असल्याने भुयारी पादचारी मार्ग बांधणे तांत्रिकदृष्ट्या संयुक्तिक नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पहेला ते गोलेवाडी (जि.भंडारा) या रस्त्यातील नाल्यावर पुलाचे बांधकाम करुन त्यापुढील रस्ता दुरुस्त करण्याबाबत

(१५) ५०३८६ (२९-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहेला ते गोलेवाडी (जि.भंडारा) या रस्त्यावरील पूलाचे बांधकाम व त्यापुढील रस्ता दुरुस्तीचा प्रश्न १५ ते २० वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याकरीता संबंधित विभागाकडे अनेक वेळा निवेदन सादर केल्यानंतरही त्याकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे प्रलंबित असल्याचे कारणे काय आहे,

(४) असल्यास, सदर प्रलंबित असलेल्या रस्ता दुरुस्तीचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करीत आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१७) : (१) अंशतः खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) जलसंपदा विभाग अंतर्गत गोसीखुर्द पुर्नवसन प्रकल्प भंडारा यांचेकडून अंतरीम निधी उपलब्ध झाला असून रस्त्याच्या तातडीच्या किरकोळ दुरूस्तीची कामे हाती घेण्यात येत आहेत. उर्वरित निधि प्राप्त झाल्यावर पूलाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

झाई (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायत अंतर्गत होत असलेली अवैध वाहतूक

(१६) ५१२७८ (३०-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झाई (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायत अंतर्गत सागरी चेक पोस्ट ते बोरीगाव घाट या रस्ता बांधणीचे कामास ऑन ड्युटी पी डबल्यूडीचे लेबल चिकटवून भरधाव वेगाने खडी, माती, मुरुमने भरलेली वाहने चालविली जात असल्याने आदिवासी मजूरांमध्ये भीती निर्माण झाल्याने अपघात होण्याची दाट शक्यता असल्याने तात्काळ कारवाई करण्याची मागणी तेथील आदिवासीनी तसेच अखील भारतीय मानवाधिकार व नागरीक प्रकल्प, डहाणू व तलासरी समितीने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदाराना कोणत्या सूचना दिल्या आणि त्यांची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून झाले,
(३) असल्यास, दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) : (१) खरे नाही.
कंत्राटदाराने त्यांच्या खाजगी वाहनांवर सा.बां.विभागाचे फलक लावून वाहने वेगाने चालविलेले असल्याचे निदर्शनास आलेले नाही असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यानी कळविले आहे. तसेच याबाबत तक्रार प्राप्त झाली नसल्याचे पोलिस निरीक्षक, तलासरी पोलिस ठाणे यांनी कळविले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

वांद्रे (मुंबई) येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहासाठी राखीव असलेला भूखंड अनधिकृतपणे वितरित करण्यात आल्याबाबत

(१७) ५३९३४ (१९-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील स.क्र.३४१ मधील मागासवर्गीय यांच्या वसतिगृहासाठी समाजकल्याण विभागाला दिलेली अनुक्रमे २४६३.६२५ चौ.मी.व ८२३.८ चौ.मी.इतकी जमीन कोणत्या अटी व शर्तीवर देण्यात आली होती,

(२) असल्यास, सदर जमीन समाजकल्याण विभागाकडून काढून घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त जागेवर सध्या बांधकाम करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी महसूल व वन विभागाने दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी नियुक्ती केलेल्या एक सदस्य समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(५) असल्यास, अहवालातील निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार याप्रकरणी पुढे काय कार्यवाही करण्यांत आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१७) : (१) मौजे वांद्रे, स.क्र. ३४१ मधील ५००० चौ. यार्ड जमीन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे आदेश दि.२९/०२/१९६४ अन्वये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह बांधण्यासाठी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे खालील अटी व शर्तीवर हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती.

i. मंजूर प्रयोजनासाठीच जमिनीचा वापर करण्यात यावा.

ii. संचालक समाज कल्याण यांना उक्त जमिनीची आवश्यकता नसल्यास सदर जमीन महसूल विभागाला परत करावी लागेल.

iii. कार्यकारी अभियंता, एक्सप्रेस हायवे डिव्हीजन, अंधेरी यांचेकडून पोच रस्त्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

iv. इमारतींच्या बांधकामाचे आराखडे शासकीय वास्तुविद्याविशारद यांचे कडून मंजूर करून घ्यावेत.

v. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून दोन वर्षाच्या आत इमारतीचे बांधकाम पुर्ण करावे लागेल.

vi. जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनासाठी न केल्यास जमीन शासनजमा करण्यात येईल.

(२) व (३) समाजकल्याण विभागाने जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनासाठी न केल्याने जमीन काढून घेण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून शासनास अहवाल प्राप्त झाला असता शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दि.०४/०८/१९८३ व दि.२०/१०/१९८३ अन्वये सदरचा भूखंड समाज कल्याण विभागाकडून काढून घेण्यात आला व सदरहू जमीन मे. असोसिऐटड जर्नल्स प्रा.लि. या संस्थेस दैनिक वृत्तपत्राच्या प्रकाशनासाठी व नेहरू लायब्ररी कम रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन करण्यासाठी प्रदान करण्यात आली. बृहन्मुंबई महानगर पालिकेने सदर भूखंडावर ५ व्या मजल्यापर्यंत बांधकामास परवानगी दिली आहे. सदर जागेवर तळमजला + ५ मजले असे अर्धवट इमारतीचे बांधकाम आहे.

(४), (५) व (६) या जमिनीविषयी अनियमिततेच्या अनुषंगाने शासनास प्राप्त झालेल्या तक्रारींच्या चौकशी करीता शासन निर्णय दि. १४/१/२०१६ अन्वये एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने पुढील उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

मौजे मरकळ (ता.खेड,जि.पुणे) येथील गट नं. २२९ च्या ७/१२ वरील बोजा रद्द करून जमिनीची विक्री केल्याबाबत

(१८) ५८४७६ (१९-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मरकळ (ता.खेड,जि.पुणे) येथील गट नं. २२९ च्या ७/१२ वरील रुपये २,०३,२०,२४४/- थकबाकी बोजा असताना हा बोजा रद्द करून जमिनीची विक्री करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे नुकसान होऊ नये याकरिता दिनांक ९ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास संबंधितानी तहसीलदार खेड, पुणे यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आह काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने नोंदी रद्द करून जमीन विक्रीस मदत करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०६-२०१७) : (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) सदर प्रकरणी संबंधित गा.न.नं.७/१२ वरील थकबाकी चुकीच्या पध्दतीने कमी केल्याबाबत तालुका लोकशाही दिनामध्ये अर्ज प्राप्त झाला होता.

(३) होय.

(४) व (५) यासंदर्भातील गा.न.नं.७/१२ पहाता त्यावर थकीत रकमांचे बोजे कायम असल्याचे तसेच विक्रीकर बोझा रद्द करुन कोणतीही खरेदी झालेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(१९) ६१०९१ (२८-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांची दुरवस्था झाली असून तब्बल १९०१ कि.मी. लांबीचे रस्ते खड्डेमय झाले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१७) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित ३४८९ कि.मी. लांबीचे रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी आहेत. या रस्त्याच्या डांबरी पृष्टभागावर काही प्रमाणात खड्डे पडले होते. या रस्त्यावरील खड्डे भरून रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.या रस्त्यांच्या लांबीतील काही क्षतिग्रस्त लांबीत मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे करणे आवश्यक आहे.

ही कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण (जि. औरंगाबाद) येथील नाथ घाटाजवळ गोदावरी नदीवर पूल बांधण्याबाबत

(२०) ६२४५३ (२४-०८-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि. औरंगाबाद) येथील नाथ घाटापासून शेगाव-अहमदनगरकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग उपलब्ध असून त्यामुळे अंतर सुद्धा कमी होणार आहे परंतु यासाठी नाथ घाटा जवळ गोदावरी नदीवर पूल उभारणे आवश्यक आहे, यापुलामुळे प्रवासाचा वेळ व इंधन आदी अनेक फायदे असल्याने या पुलाच्या बांधकामाची मागणी स्थानिक व आजूबाजूच्या सर्वच ग्रामस्थांनी वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या पुलामुळे पुढील भागात असणारी शासनाची सुमारे ११० एकर जागा वापरात येऊन वारकऱ्यांची फार मोठी सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१७) : (१) होय

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता सन २००१-२१ रस्ते विकास योजनेअंतर्गत समाविष्ट नाही. योजनाबाह्य रस्त्यावरील पूलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषात बसत नाही.

अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे
अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत

(२१) ६४२०६ (२४-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील पूल व रस्त्यांची देखरेख करण्याची जबाबदारी असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कामकाज गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता रजेवर असून इतर अधिकारी व कर्मचारी सुध्दा गैरहजर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्याचे दिवस असून जिल्ह्यातील अनेक पूल नादुरुस्त झाले असल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे गरजेचे आहे तसेच रस्त्यांची डागडुजी करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबधित अधिकारी/कर्मचारी यांना तातडीने कार्यरत करुन कामे पूर्ण करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) नादुरुस्त पुलांची व रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली असुन वाहतुक सुरळीत चालु आहे.

उरण (जि.रायगड) शहराच्या पश्चिमेस असलेल्या नागांव-पिरवाडी समुद्र किनाऱ्यावरील धूप थांबविण्याबाबत

(२२) ६५०६८ (१६-१२-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण शहराच्या पश्चिमेस असलेल्या नागांव- पिरवाडी समुद्र किनाऱ्यावरील सुपीक जमिनीची धूप थांबविण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच मुंबई मेरी टाईम बोर्डाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या किनाऱ्याची वर्षानुवर्षे होणारी धूप थांबविण्यासाठी मेरीटाईम बोर्डाने कोणतीही उपाययोजना न केल्याने समुद्राच्या वाढत्या लाटांचा परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीना, पिण्याच्या पाण्याच्या विहिरीना तसेच नागरिकांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०६-२०१७) : (१) होय. सदर विषयाबाबतचे दि.२५.३.२०१६ चे निवेदन प्राप्त आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) सदर नागांव-पिरवाडी समुद्रकिनाऱ्याची पत्तन विभागाने पाहणी व सर्वेक्षण केले आहे.

(४) नागांव-पिरवाडी येथे समुद्र धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी रु.४००लक्ष इतक्या अंदाजित किंमतीच्या कामाचा सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील चार पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत

(२३) ६५२३४ (१६-१२-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या चार पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, स्ट्रक्चरल ऑडीट मध्ये काय आढळून आले व त्यानुसार सदरील पुलांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) स्ट्रक्चरल ऑडिटची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) स्ट्रक्चरल ऑडिटचे अंतिम निष्कर्ष अद्याप प्राप्त झालेल नाहीत. परंतु, पुलाच्या प्राथमिक तपासणीनुसार चारही पूल सुस्थितीत आहेत. तथापि स्ट्रक्चरल ऑडिट मधील निष्कर्षानुसार आवश्यक उपाययोजना करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मालाड पूर्व, दिंडोशी, येथील शासकीय जागेत तहसिल व शिधा वाटप कार्यालय सुरु करण्याबाबत

(२४) ६५८९९ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड पूर्व, दिंडोशी, ज. अरुणकुमार वैद्य मार्ग, येथील अग्निशमन केंद्राजवळील, न.भू.क्र. १०८ मधील, ४,११७.६ चौ.मी. क्षेत्रफळाचा शासकीय मालकीचा भूखंड, अतिक्रमण मुक्त करुन, मालाड पूर्व भागातील, लाखो नागरीकांसाठीच्या, सार्वजनिक हितार्थ तहसिल व शिधा वाटप कार्यालय सुरु करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत, लोकप्रतिनिधीं यांनी मा. मुख्यमंत्री यांना, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१६ रोजी लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय भूखंडाचा होत असलेला अपव्यय बंद करुन नागरीकांना सेवा प्रदान करण्यासाठी व शासकीय कार्यालयासाठी तात्काळ भूखंड उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१७) : (१), (२) व (३) मौजे दिंडोशी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १०८ हा ४,११७.६० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड आहे. सदर भूखंडापैकी १६.५० चौ.मी. क्षेत्रावर अतिक्रमण करण्यात आलेले असुन, सदर अतिक्रमणे जिल्हाधिकारी यांनी यापूर्वीच निष्कासित केली आहेत. सदर अतिक्रमण धारकांनी नगर दिवाणी न्यायालय दिंडोशी येथे याबाबतचा दावा दाखल केलेला आहे. मौजे दिंडोशी येथील न.भू.क्र. १०८ मधील न्यायालयीन वादातील १६.५० चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र ४१०१.१० चौ.मी. इतके आहे. शासनाच्या निर्देशान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २४/०९/२०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर ४१०१.१० चौ.मी. क्षेत्राचा आगावू ताबा, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांना सात वर्षांकरिता दिला आहे. प्रस्तुत जागेवर एम.एम.आर.डी.ए. मार्फत सुरक्षारक्षक तैनात करण्यात आलेले आहेत.

मौजे दिंडोशी हे गांव बोरीवली तालुक्यात आहे. या तालुक्याचे मुख्यालय बोरीवली (पश्चिम) येथे असुन तेथील तहसिलदार कार्यालय शासकीय जमिनीवरील स्वतंत्र इमारतीत आहे. सदर कार्यालय जनतेच्या सोयोचे असल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नगरभूमापन कार्यालय, उल्हासनगर येथील रिक्त पदे भरण्याबाबत

(२५) ६६६५९ (१६-१२-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरभूमापन कार्यालय उल्हासनगर येथे नगरभूमापन अधिकारी (भूमापन कार्यालय प्रमुख), वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक ही पदे अनुक्रमे दि.०१/०२/२०१५, ०१/०९/२०१६ व दि.२३/०६/२०१६ पासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त तीनही पदांचे पदभार अतिरिक्त कार्यभार म्हणून इतर अधिकारी कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महत्वपूर्ण अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे तेथील शासकीय कामांचा खोळंबा झालेला असल्याने शासनाकडे अनेक तक्रारी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०५-२०१७) : (१) होय.
(२) होय.
(३) असे निदर्शनास आले नाही. अतिरिक्त पदभारातील अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून कामाची निर्गती होत आहे. त्यामुळे शासकीय कामाचा खोळंबा झालेला नाही.
(४) रिक्त पदे भरणेची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत

(२६) ६६९०९ (१६-१२-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अरबी समुद्रातील शिवस्मारक उभारण्याच्या प्रकल्पाचा वाद राष्ट्रीय हरित न्यायाधिकारणात दाखल केला असून या प्रकरणी जैवविविधता धोक्यात येत असल्याबाबत खुलासा केंद्र व राज्य शासनाकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी सुकाणू समिती नेमलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक उभारण्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीने सादर केलेला आराखडा आणि संकल्पनेला राज्य सरकाने मंजुरी दिली असून मुंबई महानगरपालिकेला मंजुरीसाठी पाठविल्यानंतर ३ महिन्याच्या अवधीत निर्णय देण्याचे आदेश देऊनही ६ महिन्यानंतर सुध्दा सदर प्रकरणी महानगरपालिकेकडून निर्णय न दिल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने महापालिकेकडून स्मारकाच्या आराखड्यास मंजूरी मिळवून शिवस्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०५-२०१७) : (१) शिवस्मारक प्रकल्पाबाबत राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे सप्टेंबर, २०१६ मध्ये अर्ज दाखल झालेला आहे. सदर अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने राज्य शासन तसेच केंद्र सरकार यांचे संबंधीत प्रतिवादी यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र राष्ट्रीय हरित लवादापुढे सादर केलेले आहे.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे सविस्तर आराखडे हे महानगरपालिका /सक्षम प्राधिकरण यांच्याकडे मान्यतेकरीता सादर करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरेगाव-भिमा-केंदूर पाबळ रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(२७) ६७३१३ (०५-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील अनेक गावे वाडयावस्त्यांना जोडणारा कोरेगाव-भिमा-केंदूर पाबळ हा रस्ता अत्यंत अरुंद असल्याने व या रस्त्यावर अनेक खडडे पडल्याने वाहतूकीस धोकादायक बनला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरेगाव भिमा,वढू येथील ग्रामस्थांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी मा. पालकमंत्री, पुणे यांना कोरेगाव-भिमा-केंदूर पाबळ रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत व या रस्त्यासाठी केंद्रीय रस्ते निधी मधून निधी मिळण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,वढू बु येथील छत्रपती संभाजी महाराजांची समाधी स्थळ, केंदूर येथील कान्हूराज महाराज देवस्थान, पाबळ येथील पद्मिनी जैन देवस्थान व ऐतिहासिक मस्तानीची कबर या ठिकाणी जाण्यासाठी या रस्त्याचा वापर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरेगाव-भिमा-केंदूर पाबळ हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०५-२०१७) : (१) अंशत: खरे आहे. सदर रस्त्याच्या धावपट्टीवरील खड्डे भरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२) व (३) होय.
(४) व (५) विषयांकित रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

नवापूर (जि.नंदूरबार) येथील रंगावली नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

(२८) ६७४०९ (१६-१२-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.नंदूरबार) येथील रंगावली नदीच्या मोठ्या पुलावर जास्त मोठया प्रमाणात खड्डे पडले असल्याने व आलेल्या पुरामुळे या पुलवारील असलेला रहदारीचा मार्ग धोकादायक झाल्याने असलेल्या जुन्या मार्गाचा वापर केल्यामुळे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी एस.टी.बस पुरात अडकली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाले नविन मोठ्या पुलावरील रस्त्यांची झालेली दुरवस्था व पुलावर पडलेले खडडे दुरुस्ती करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१७) : (१), (२) व (३) हे खरे आहे.

राष्ट्रीय राजमार्ग क्र.६, फागणे ते महाराष्ट्र - गुजरात सिमेपर्यंतचे लांबीवरील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत दि.०९/११/२०१६ रोजी सुरु झालेले आहे. सदयस्थितीत नवापुर येथील रंगावली नदीच्या पुलावरील मोठे खड्डे भरण्यात आले आहेत. सदयस्थितीत रस्त्याची अवस्था वाहतूकीस योग्य आहे, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

घोटी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) या रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याबाबत

(२९) ६७९१५ (१६-१२-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात वाकी धरणामध्ये घोटी-त्र्यंबकेश्वर हा रस्ता गेल्याने नवीन पर्यायी रस्ता तीन वर्षापूर्वीच बनविण्यात आल्या असून रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करुन निकृष्ट दर्जाचे काम करण्याऱ्या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याच्या एकूण लांबीपैकी वाकी धरणाच्या बुडीत क्षेत्रालगतच्या ५.४० किमी लांबीचा रस्ता जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली होता. दिनांक ९.१.२०१७ रोजी रस्ता सुधारणेच्या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या शर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. काम प्रगतीपथावर आहे. जलसंपदा विभागाकडून निधी प्राप्त होईल त्याप्रमाणे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर-नागपूर या राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत करण्यात येणाऱ्या जमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना चालू बाजारभावाने देण्याबाबत

(३०) ६७९४६ (१६-१२-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-नागपूर हा राष्ट्रीय महामार्ग नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर वळणरस्ता धरुन होणार असल्याने या रस्त्याच्या मध्यभागातून दोन्ही बाजूंनी १०० फूट शेतकऱ्यांची जमीन संपादीत केली जाणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्यामुळे संपादीत होणाऱ्या जमीनीमुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला चालू बाजारभावाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०६-२०१७) : (१) होय.

(२) भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे.

(३) भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) भूसंपादनाची प्रक्रिया मुदतीत पूर्ण करून मावेजा वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील काटेपुर्णा नदीवरील पुलाची झालेली दुरवस्था

(३१) ६८०६२ (१६-१२-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील जऊळका रेल्वे येथील काटेपुर्णा नदीवरील पुलाची दुरवस्था झाली असून पुलाच्या बाजूला असलेले कठडे अनेक ठिकाणी तुटलेले असल्याने पुलावरुन जाताना वाहनधारकांना मोठया प्रमाणात खड्डयातून जावे लागत असून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या पुलाचे रुंदीकरण करुन पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१७) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर पुलाच्या एका गाळयामधील कठड्याचा काही भाग वाहनाची धडक लागल्यामुळे नादुरुस्त झाला होता. त्याची दुरुस्ती केली आहे. पुलाचे संरचणात्मक तपासणी करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत पुल वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गगनबावडा ते विजयदुर्ग (जि.सिंधुदूर्ग) या राज्य मार्ग क्रमांक १७७ ची झालेली दुरवस्था

(३२) ६९५२२ (१६-१२-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा ते विजयदुर्ग (जि.सिंधुदूर्ग) या राज्य मार्ग क्रमांक १७७ ची अत्यंत दुरवस्था झालेली असल्याबाबत तसेच राज्य महामार्गावर उजव्या बाजूला ३१२१२ मी लांबीची रस्त्यांच्या मध्यापासून ९ मीटर अंतरावर टाकण्यात आलेल्या ऑप्टीकल फायबर केबल मे.रिलायन्स जीओ इन्फोकॉम लि. मुंबई यांनी टाकली असल्याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी सदर केबल जागा असताना रस्त्याच्या साईडपटटी वरुन ९ मी. च्या आत टाकली असल्यास संबधित कनिष्ठ अभियंता यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्याचे व रस्ता नादुरुस्त झाल्यास कंपनीकडून अनामत रक्कम रुपये ३७ लक्ष हे सदरच्या रस्त्यावर खर्च करण्यात येतील असे आश्वासन अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. रिलायन्स जीओ इन्फोकॉम लि. मुंबई यांच्याकडून अनामत रक्कम रुपये ३७ लक्ष माहे डिसेबर, २०१५ ला खर्च केल्याचे माहीती नुकतीच माहे सप्टेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागविलेल्या माहितीच्या अधिकारात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना चुकिची माहीती देवून संबधित अधिकारी यांनी मंत्री महोदयांची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर व दोषी कंपनीवर शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०५-२०१७) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मा.मंत्री महोदयांनी माहे मार्च २०१६ च्या अधिवेशनामध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४०८६० ला उत्तर देताना", रस्त्याच्या मध्यापासून १५ मी.अंतरावर केबल टाकणेचे नियम असूनही काही ठिकाणी अलिकडे टाकल्या गेल्या असतील, साईडपट्टीवर टाकल्या असतील तर तेथील डेप्युटी इंजिनिअर ज्याच्या अंतर्गत हे काम चालते तोच त्याला जबाबदार आणि त्याच्यावर नक्की कारवाई केली जाईल", असे आश्वासन दिले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू ते बोर्डी (जि.पालघर) रस्त्यापर्यंतच्या जमिनीची धूप होऊन रस्त्याच्या बाजूस असलेली सुरूची झाडे नष्ट होत असल्याबाबत

(३३) ६९९०६ (१६-१२-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू ते बोर्डी (जि.पालघर) रस्त्यापर्यंतच्या जमिनीची धूप होत असून रस्त्याच्या बाजूला लावलेली सुरूची झाडे समुद्राच्या लाटांमुळे नष्ट होत असल्याचे निदर्शनास येवूनही याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील ग्रामस्थ, मच्छिमार व वाहतूकदारांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर-सांगली रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम थांबविल्याबाबत

(३४) ७००८९ (१६-१२-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-सांगली या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम थांबविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत या रस्त्याचे काम किती प्रमाणात पूर्ण झाले आहे तसेच अपूर्ण काम प्रलंबित रहाण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरचा रस्ता राष्ट्रीय प्राधीकरणाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने एक कालबद्ध कार्यक्रम आखून उर्वरित रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) रस्त्याचे काम थांबविणेत आलेले नाही, सद्यस्थितीत रस्त्याचे ५९ टक्के पूर्ण झाले असून काम प्रगतीत आहे.
(३) सदरचा रस्ता राष्ट्रीय प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आलेला नाही, मात्र सदरचा रस्ता राष्ट्रीय महामार्ग घोषित झाला असल्याने प्राधिकरणाकडे वर्ग करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(४) शासन निर्णय क्र. खाक्षेस-२००९/ प्र .क्र.१/रस्ते-९-अ, दि.२५.१०.२०१६ अन्वये या प्रकल्पाचे आतापर्यंत झालेल्या कामाच्या किंमतीची परिगणना करणेसाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पाचे मूल्यांकन करण्यात आले आहे.
(५) प्रकल्पाच्या आतापर्यंत झालेल्या कामाच्या किमतीच्या परिगणनेबाबतचा अहवाल प्राप्त झाला असून, करारनाम्यातील Financial Bid Vol.III मधील पान क्र.१० वरील Bill of Quantities (BOQ) प्रमाणे किंमत काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

बुलडाणा शहरातील कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवास स्थानाची दुरवस्था झाल्याबाबत

(३५) ७०२३५ (१६-१२-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा शहरातील अनेक कर्मचारी यांच्या शासकिय निवास स्थानाची दुरवस्था झाली असून निवासस्थाने पावसाळयात गळणे, पिण्याच्या पाण्याची असुविधा, नादुरुस्त दरवाजा-खिडक्या ई. समस्यांनी ग्रासले असल्याची बाब माहे, सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवास स्थानांची दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) शासकीय कर्मचाऱ्यांची निवासस्थाने दुरूस्त करण्यासाठी विविध इमारत दुरूस्ती कार्यक्रमामधून निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमानुसार निवासस्थान दुरूस्ती कार्यक्रम मंजूर करण्यात आलेला आहे व त्यानुसार निवासस्थानाची दुरूस्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबई आणि नवी मुंबईला जोडणारा पहिला (जुना) पुल खचल्याबाबत

(३६) ७०४४८ (१६-१२-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि नवी मुंबईला जोडणारा पहिला (जुना) पुल माहे ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यादरम्यान खचला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाची शासनातर्फे पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या पुलाच्या पाहणीनंतर नवीन पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन पुल क्षतीग्रस्त झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून दि.१४.८.२०१६ पासून पुलावरील वाहतुक बंद करण्यात आली होती. क्षतीग्रस्त भागाची डागडुजी करून दि.२२.१२.२०१६ पासून प्रश्नाधीन पुलावरील वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

(३) प्रश्नाधीन जुना पूल पाडून नवीन पूल बांधण्याबाबत कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत विभागाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जुन्या मोढयातील गोदावरी नदीवरील (जि. नांदेड) पूलांची दुरुस्ती करण्याबाबत

(३७) ७०६२४ (१६-१२-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या मोढयातील गोदावरी नदीवरील (जि. नांदेड) पूलाच्या दुरुस्ती कामाचे उद्घाटन होऊन दोन महिने झाले तरी अद्याप कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुरुस्तीच्या कामास सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुरुस्तीच्या कामास तातडीने सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन पुलाचे दुरूस्तीचे काम विहीत मुदतीपूर्वी पूर्ण करण्यात येऊन पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील प्रमुख राज्यमार्ग क्रमांक १० या रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

(३८) ७०६४६ (१६-१२-२०१६). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील सारखणी-मांडवी-पिंपळगांव ते राज्यसीमा व इस्लापूर-किनवट-घोटी-आंबाडी-पिंपळगांव ते राज्यसीमा प्रमुख राज्यमार्ग क्रमांक १० या रस्त्यावर पूरहानी अंतर्गत नुतनीकरणाचे काम मंजूर असून अडीच वर्षाचा कालावधी लोटून माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर पर्यंत काम पूर्ण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१७) : (१) होय. अंशत: खरे आहे.

(२) व (३) पूरहानी गट-ई कार्यक्रमांतर्गत प्रश्नाधीन रस्त्यावर ७ कामे मंजूर आहेत. त्यापैकी ६ कामे पूर्ण झाली असून एक काम प्रगतीपथावर आहे. ते ३१.१.२०१७ रोजी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ ते आमोदा (ता.यावल, जि.जळगांव) रामा-४४ या रस्त्याच्या झालेल्या दुरवस्थेबाबत

(३९) ७०९८१ (१६-१२-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ ते आमोदा (ता.यावल, जि.जळगांव) रामा-४४ हा रस्ता वाहतुकीस अत्यंत धोकादायक झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्ता दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्नांकित रस्ता रामा.४४ असून लांबी ४४ किमी आहे. हा रस्ता गुजरात व मध्यप्रदेशातून येणाऱ्या रस्त्यांना जोडणारा आहे. या रस्त्यावरून अवजड वाहनांची वाहतूक मोठया प्रमाणावर होत असते. रस्ता काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाला होता. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिकनगाव-पाल-सावदा-पिंपरूड रामा- ४५ (भाग-पाल ते रावेर फाटा)
या रस्त्याच्या झालेल्या दुरवस्थेबाबत

(४०) ७०९८४ (१६-१२-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिकनगाव-पाल-सावदा-पिंपरूड रामा- ४५ (भाग-पाल ते रावेर फाटा) हा रस्ता वाहतुकीस अत्यंत धोकादायक झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरचा रस्ता दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१७) : (१) नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

(२), (३) प्रश्नाधीन रस्त्यावर रावेर फाटा ते पाल रामा क्र.१८९ मधील किमी ३५/०० ते ४०/०० या लांबीत डांबरी नूतनीकरण व मजबूतीकरणाचे काम सन २०१२-१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

सदर रस्ता सुधारण्याचे काम मंजूर करण्यात आले आहे. कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नेमणूकीची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बलगुजर (ता.जि.बीड) येथील शेतकऱ्यांच्या जमीनीस अल्प मावेजा मंजूर केल्याबाबत

(४१) ७१०६२ (१६-१२-२०१६). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या नविन रेल्वे मार्गासाठी संपादीत केलेल्या मौजे बलगुजर (ता.जि.बीड) येथील सर्व्हे नं.८४ व ८७ या जमीनीला १०५ रुपये प्रती चौ. प्रमाणे व सर्व्हे नं.८२, ८९, ९२, १००, १०१, १०२, १०३ या लगतच्या जमीनीना १८०० रुपये प्रती चौ. मीटर असा मावेजा जिल्हाधिकारी बीड यांनी मंजूर केल्याने सर्व्हे नं.८४ व ८७ या जमिन मालकांचे नुकसान होऊन त्यांच्यावर अन्याय झाल्याबाबतची तक्रार विहित मुदतीत दिनांक १/१२/२०१५ रोजी जिल्हाधिकारी बीड व दिनांक १४/७/२०१६ रोजी .विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड व विभागीय आयुक्त यांनी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने सर्व्हे नं.८४ व ८७ या जमिन मालकांना प्रति चौ. रुपये १८०० प्रमाणे मावेजा देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-०३-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) अर्जदाराच्या मागणी प्रमाणे दर देण्याकरिता निवाडयामध्ये भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम-३३ नुसार दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी,परंतु निवाड्याच्या तारखेपासून सहा महिन्यापेक्षा नंतरच्या नसेल अशा कालावधीत किंवा जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये त्याने कलम ६४ खालील प्राधिकाऱ्याकडे निर्देश करणे आवश्यक असेल तेव्हा, असा निर्देश करण्यापूर्वि, कोणत्याही निवाड्यांमधील लेखन विषयक किंवा अंकगणितीय स्वरूपाच्या चुका किंवा एकतर, त्याच्या स्वत:च्या प्रस्तावावरून किंवा हितसंबंधित व्यक्तिने किंवा स्थानिक प्राधिकरणाने केलेल्या अर्जावरून त्यात दिसून आलेल्या दोषांची, आदेशाद्वारे दुरूस्ती करता येईल. तसेच कलम ६४ नुसार ज्यांनी निवाडा स्वीकारला नाही. अशा व्यक्तीला जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज करून या बाबत जिल्हाधिकारी यांनी निवाड्यासाठी प्राधीकरणाकडे निर्देशीत करावी अशी मागणी करता येईल. मग तीचा आक्षेप जमिनीच्या मापना संबंधी अथवा भरपाईच्या रक्कमे संबंधी असो अशी तरतुद आहे. त्यानुसार संबंधित हितसंबंधितानी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती (राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ बायपास) या रस्त्यावर कोणत्याही प्रकारे संरक्षनात्मक उपाययोजना नसल्याबाबत

(४२) ७१२५२ (१६-१२-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ बायपास) रस्त्यावर आतापर्यंत माहे सप्टेंबर, २०१६ पासून अनेक मुकी जनावरे ४ चाकी वाहनाच्या धडकेमुळे मृत्यूमुखी पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आय. आर. बी. या कंपनीने या राष्ट्रीय महामार्गावर कोणत्याही प्रकारे संरक्षनात्मक उपाययोजना न करता टोल वसुली करित आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आय. आर. बी. या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०४-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे.

रस्त्यावर मुकी जनावरे मृत्यूमुखी पडतात व त्यामध्ये कुत्र्यांचा मुख्यत: समावेश असतो. परंतु यामध्ये गायी म्हशी यासारखे प्राणी मरण पावल्याची तक्रार प्राप्त नाही.
(२) हे खरे नाही.

या बायपासवर वाहनांसाठी ४ भुयारीमार्ग व पादचाऱ्यांसाठी २ भुयारी मार्ग सुरक्षेच्या दृष्टीने बांधण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील लक्ष्मी दहिवाडी ते गुंजेगाव या रस्त्याची झालेली दुरवस्था

(४३) ७१३७० (१६-१२-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील लक्ष्मी दहिवाडी ते गुंजेगाव या रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावर काटेरी झुडपे वाढली असून ही काटेरी झुडपे रस्त्यावर आली असल्यामुळे येथे प्रवास करीत असताना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती व रस्त्याच्या बाजूला वाढलेली काटेरी झुडपे काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर काही प्रमाणात खड्डे पडले होते. सदर खड्डे डांबर मिश्रित, खडीने भरण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्त्याच्या लगत वाढलेली काटेरी झुडपे काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

रस्त्याच्या काही लांबीत सुधारणा, मजबूतीकरण, डांबरीकरण करण्याचे कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील नातेपुते-दहिगाव या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(४४) ७१३७७ (१६-१२-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील नातेपुते-दहिगाव या रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) : (१) नाही.

प्रश्नांकित रस्ता हा डाळज कळस वालचंदनगर नातेपुते शिंगणापूर दहिवडी कराड या रा.मा.१२४ चा भाग आहे. रस्त्याची नातेपुते ते दहिगाव या दरम्यानची लांबी २५.१०० कि.मी आहे. या भागातील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पावसाळयात काही प्रमाणात खड्डे पडले होते. सदर खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) या प्रश्नांकित लांबीतील रस्त्याच्या काही भागात मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम करणे आवश्यक आहे. या लांबीतील काम मंजूरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सुर्या नदीवरील (ता.डहाणू, जि.पालघर) कासा पूलाची दुरवस्था झाल्याबाबत

(४५) ७१३८० (१६-१२-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुर्या नदीवरील (ता.डहाणू, जि.पालघर) कासा पूल डहाणू जव्हार-विक्रमगड यांना जोडणारा मुख्यराजमार्गावरील महत्वाचा पुल आहे, सदरहू पुलाची दुरुस्ती अभावी मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून सदरहू पुलाला संरक्षण कठडे व पथ दिव्यांची योग्य सोय नसल्याने या पुलाची मुदत संपली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) : (१) प्रश्नांकीत जुन्या पूलाला समांतर नवीन पर्यायी पूल बांधण्यात आलेला आहे. या नवीन पूलावरुन मार्च २०१६ पासून वाहतूक चालू आहे. जूना पूल वाहनांसाठी पूर्णत: बंद करण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

मौजे बांगार्डे (ता.माळशिरस, जि.सोलापूर) व मौजे निमसाखर,(ता.इंदापूर, जि.पुणे) या दोन्ही गावांना जोडण्यासाठी निरा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

(४६) ७१३८२ (१६-१२-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बांगार्डे (ता.माळशिरस, जि.सोलापूर) व मौजे निमसाखर (ता.इंदापूर, जि.पुणे) या दोन्ही गावांना जोडण्यासाठी निरा नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त ठिकाणी पूल उभारण्यासाठी तातडीने अंदाजपत्रक मागवून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) : (१) व (२) होय.
(३) व (४) मौ.निमसाखर (ता.इंदापूर, जि.पुणे) या गावापासून तसेच मौ.बांगर्डे (ता.माळशिरस, जि.सोलापूर) या गावापासून निरा नदीपर्यंतचा रस्ता योजनाबाह्य (Non plan) आहे. योजनाबाह्य रस्त्यावरील पूलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषात बसत नाही.

मनोर-पालघर (जि.पालघर) रस्त्यालगतच्या घाटामध्ये तीन ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडल्याबाबत

(४७) ७१५३२ (१६-१२-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनोर-पालघर (जि.पालघर) रस्त्यालगतच्या घाटामध्ये तीन ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची अनेकवेळा दुरूस्ती करूनही पावसाळयामध्ये दरडी कोसळण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१७) : (१) होय.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चौके-धामापूर-कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याच्या झालेल्या दुरवस्थेबाबत

(४८) ७१७६८ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौके-धामापूर-कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची सद्यस्थितीत अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याची शासनाकडून पाहणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर पाहणीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने सदरहू रस्त्याच्या नुतनीकरण व डांबरीकरणाचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०३-२०१७) : (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरवली-कुचांबे या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत

(४९) ७२४६६ (१६-१२-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरवली-कुचांबे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून या मार्गाची अत्यंत दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण करण्याबाबत मागणी करण्यात येऊनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण करण्याबाबत व दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-०३-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

तथापि सदर रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील पडलेले खड्डे भरणेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) हे खरे नाही,

प्रश्नांकित रस्त्याच्या एकूण लांबीतील ३ कि.मी. लांबीमध्ये सुधारणा व डांबरीकरणाचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

वारणा नदीवरील निलेवाडी-ऐतवडे (जि. कोल्हापूर) या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

(५०) ७८०९३ (१५-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारणा नदीवरील निलेवाडी-ऐतवडे (जि. कोल्हापूर) हा पूल धोकादायक अवस्थेत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाची दुरुस्ती करण्याची मागणी तेथील स्थानिकांनी वारंवार संबधिताकडे करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पूलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

तथापि पुलाच्या वहन मार्गावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूक सुरळीत सुरु आहे. रेलींगच्या दुरुस्तीचे काम मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.